या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार १६ जूले २०२४ | अंक२१९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# वादग्रस्त प्रोबेशनरी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचा कारनामा उघड

## पूजा खेडकर यांच्या आईंना पोलिसांची नोटीस, बंदूक दाखवणं भोवलं



**२०१९-२० पर्यंत पूजा खेडकरांनी यूपीएससी परीक्षा देताना वडिलांचे नाव दिलीपराव असे लिहिले होते. त्यातही स्पेलिंगमध्ये डी डबल ई लिहीले आणि नावाची सुरूवात आडनावापासून होत असे जसे सर्व महाराष्ट्रीय नावांमध्ये असते. मात्र २०२१ पासून त्यांनी पूजा मनोरमा दिलीप खेडकर असे नाव यूपीएससी परीक्षा देताना दयायला सुरूवात केली. त्यांनी नावात आईचे नाव लिहायला सुरूवात केली आणि वडिलांचे नाव फक्त दिलीप केले. त्यांचे स्पेलिंग ही बदलण्यात आले. वडीलांच्या नावात डी डबल इ ऐवजी डी आय असे लिहिले. राज्य सरकारने नावात आईचे नाव लावण्याचा निर्णय २०२४ मध्ये घेतला आहे. तर मग पूजा खेडकर यांनी २०२१ पासूनच आपल्या नावात आईच्या नावाचा समावेश केला होता. त्याआधी त्या आईचे नाव का वापरत नव्हत्या असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

**प्रतिनिधी/विशेष**

वादग्रस्त प्रोबेशनरी आयएएस अधिकरी पूजा खेडकर यांचा आतापर्यंत सर्वात मोठा कारनामा उघड झाला आहे. पूजा खेडकर आणि त्यांच्या कुटुंबीयांचे आणकी एक मोठा कारनामा समोर आला आहे. पूजा खेडकर यांनी ११ वेळा युपीएससी परीक्षा दिली. नावात बदल करून त्यांनी ही परीक्षा दिली असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे आता पूजा खेडकर यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. पूजा खेडकर आणि त्यांच्या कुटुंबीयांविरोधात कारवाई होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पूजा खेडकर यांनी नावामध्ये बदल करून यूपीएससीला गंडवण्याचा प्रयत्न केला. पूजा खेडकर यांचे यूपीएससीचे अटेम्प्ट संपले असतानाही त्यांनी नावात बदल करून पुन्हा यूपीएससीची परीक्षा दिल्याचा आरोप आहे. पूजा खेडकर ११ वेळा यूपीएससीची परीक्षा दिली. पूजा खेडकर यांनी २०१९-२० पर्यंत खेडकर पूजा दिलीपराव या नावानं यूपीएससीची परीक्षा दिली. तर २०२१ आणि २०२२ ला त्यांनी नावात बदल करत पूजा मनोरमा दिलीप खेडकर या नावाने यूपीएससीची परीक्षा दिली. यूपीएससीमध्ये पूजा खेडकर यांच्या दोन्ही नावांच्या लिस्ट आहेत. आयएएस अधिकारी पूजा खेडकरांच्या घरी पुणे पोलीस धडकले; मनोरमा खेडकरांना बजावली नोटीस पूजा खेडकर यांनी नावातील हा बदल फक्त यूपीएससीची अटेम्प्ट वाढवून मिळाव्यात यासाठी केला असल्याचा आरोप होत आहे. नावात बदल केल्याने पूजा खेडकर यांना त्यांच्या यूपीएससीचे अटेम्प्ट संपले असतानाही परीक्षा देत आल्या. त्यांनी नावात बदल केल्यानेच यूपीएससीच्या फिल्टरमध्ये त्या अडकल्या नाहीत. ओबीसी म्हणून पूजा खेडकर यांना ९ वेळाच यूपीएससीची परीक्षा दिली होती. त्यांचे हे अटेम्प्ट २०१९-२० मध्येच संपले असल्याची बातमी आहे. त्यामुळेच २०२० मध्ये आधी कॅटकडे म्हणजेच केंद्रीय प्रशासकीय प्राधिकरणाकडे याचिका केली. या याचिकेमधून त्यांनी बहुविकलांगत्वासाठी त्यांना यूपीएससीचे अटेम्प्ट वाढवून मिळावी. तसंच, एसटी आणि एसटी विद्यार्थ्यांप्रमाणे अमर्यादित संधी देण्यात याव्यात अशी मागणी केली होती. पण कॅटनं पूजा खेडकर यांची ही मागणी फेटाळली.



## बस बंद झाल्याने विद्यार्थी आणि वयस्कर प्रवाशांचे हाल

**केज/प्रतिनिधी**

रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे एस टी सेवा बंद होऊन तीन चार गावातुन केजला शाळा महाविद्यालयासाठी येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी व वयस्कर प्रवाशांचे मोठे हाल सुरू आहेत.

केज तालुक्यातील कानडी माळी या गावांमध्ये रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. सध्या तर ते अर्धवट



अवस्थेतच सोडून संबंधित गुत्तेदार त्याकडे दुर्लक्ष करत आहे यामुळे या अर्धवट कामामुळे रस्त्यावरुन मोठी वाहने जायला अडथळा निर्माण झाला आहे. यामुळेच बस सेवा देखील मागील महिन्यापासून बंद झालेली आहे. कानडी मधुन साबला, धर्माळा या गावांना जाणाऱ्या लोकांची यामुळे मोठी गैरसोय झाली आहे. एस टी बस बंद झाल्याने या बसने केजला शाळा कॉलेज करीता जाणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनी आणि गावातील वयस्कर तसेच आजारी माणसांच्या प्रवासाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. खाजगी वाहन सेवा या मार्गावर उपलब्ध नाही आणि एखादं वाहन आरलेच तर त्याचे तिकीट न परवडणारे असते म्हणून प्रवाशांना मोठा फटाका बसत आहे. यावर संबंधित यंत्रणेने तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करणे आवश्यक आहे.

## मुद्रिकाबाई जनार्धन घाडगे यांचे दुःखद निधन प्रकाश घाडगे यांना मातृशोक

बीड/प्रतिनिधी काल कथित मुद्रिकाबाई जनार्धन घाडगे दुःखद निधन, आज दिः १५/०७/२०२४ रोजी पहाटे ०३ वाजता हृदय विकाराच्या तिव्र धक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात तीन मुलं, दोन मुली सुनो नातवंडे असा भरगच्च परिवार आहे.त्यांचा धम्मकार्यात सक्रिय सहभाग होता,मनमिळावू स्वभावाच्या म्हणून त्या अंकुश नगर भागात सुपरीचित होत्या.अंकुश नगर येथील वैकुंठ धाम स्मशान भुमी अंत्यसंस्कार करण्यात आला. याप्रसंगी बीड शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, आप्तेष्ट नातेवाईक विविध सामाजिक राजकीय पक्ष संघटनेचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते तसेच बीड शहरातील धम्म बांधव,अंकुश नगरीतील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. घाडगे कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

# राजेगाव येथील मजूर महिला सोबत घडला प्रकार मारफळ येथे शेतकऱ्यांकडून मजूर महिलांना दगडाने केली मारहाण

## वंचित बहुजन आघाडीची मागणी आरोपींना तात्काळ अटक करा-विष्णू देवकते

**बीड/प्रतिनिधी**

राजेगाव येथील महिला कामानिमित्त मारफळ येथे गेल्या होत्या त्यांनी काम लवकर उरकले व ठरल्याप्रमाणे गुत्त्याचे पैसे मागितले, शेतकऱ्याने दिले नाही खुज्जत घातली व दगडाने मारहाण केली. ही घटना गेवराई तालुक्यातील मारफळे येथे घडलो गेवराई विधानसभा मतदारसंघातील राजेगाव येथील वंचित समूहातील महिला खुरपणीसाठी मारफळा ता.गेवराई येथे गेले असता राजेगाव येथील काही महिला मारफळा तांडा यथे शेतात खुरपणी साठी गेल्या असता



त्यांनी खुरपणी च काम गुत्ते घेतले होते. महिलांनी दिवसभर दुपारी न जेवण करता न बसता खुरपणीचं काम पूर्ण केले काम पूर्ण झाल्यानंतर तुम्ही एवढ्या लवकर खुरपणी कशी काय झाली मनत शेतकऱ्याने पैसे देण्यास नकार दिला.संध्याकाळी खुरपणीचं काम संपल्यानंतर महिलांनी ठरलेल्या रोजंदारीच्या पैशांची मागणी केली असता संबंधित शेतकऱ्यांनी महिलांना रोजंदारीच्या पैशासाठी नकार दिल्यानंतर महिलांना व रिक्षा चालकाला अश्लील भाषेत जातीवाचक शिवीगाळ करून दगडाने हनमार करण्यास सुरुवात केली.या मारहाणी मध्ये काही महिला जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे.अशा जातीयवादी व निच प्रवृत्तीच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर निषेध केला आहे .यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते इंजि.विष्णु दादा देवकते,वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पू गायकवाड तालुका महासचिव किशोर भोले,पप्पू वाव्हळ, अखिल भाई,वंचित बहुजन आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी राजेगाव येथे जाऊन मारहाण झालेल्या महिला भगिनींची,रिक्षा चालक व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सर्व कुटुंबियांना धीर दिला. जोपर्यंत महाराज झालेल्या महिला न्याय मिळत नाही तोपर्यंत वंचित बहुजन आघाडी आपल्या सोबत आहे. ज्या ज्या वेळेस कुठेही अडचण निर्माण होईल त्या त्या वेळेस वंचित आघाडी तुमच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहोत असा शब्द दिला. संबंधित आरोपीवर गुन्हा दाखल झालेला असून लवकरात लवकर आरोपींना अटक करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तलवाडा पोलीस स्टेशनचे पीआय यांच्याकडे करण्यात आली.

कविता

## टिचभर पोटासाठी

टिचभर पोटासाठी
काय काय करतात
भविष्याच्या आशेवर
जितेपनी मरतात !!

टिचभर पोटासाठी
खोटंनाट बोलतात
देवाच्या नावानं कुणी
भक्तांस फसवतात !!

टिचभर पोटासाठी
हे काय काय खातात
पैसा,जमीन बंगला
सारं काही पचोतात !!

टिचभर पोटासाठी
हे हप्ता पण खातात
हरामी कमाईतून
हाय फाय राह्यतात !!

टिचभर पोटासाठी
भ्रष्टाचार करतात
नेता,अधिकारी,दलाल
ह्या देशाले लुटतात !!

टिचभर पोटामंदी
सारचं काही लपते
कुणी खातोय तुपाशी
कुणी उपाशी झोपते !!

टिचभर पोटासाठी
एक भाकर लागते
तरीपण हा माणूस
असा कसा हो वागते ???

वासुदेव महादेवराव खोपडे
सहा पोलीस उपनिरीक्षक(सेनि)
अकोला 9923488556



# नाशिक मध्ये कोयता गँगचा पुन्हा धुमाकूळ

**नाशिक/प्रतिनिधी**

देवळालीकँम्प : हाडोळा परिसरात गेल्या पंधरा दिवसांमध्ये दोन वेळा कोयता गँग कडुन दहशत निर्माण करत , गाड्यांची तोडफोड करण्यात आली .दहशतखोर एवढ्या वरच थांबले नसून डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला देखील त्यांनी नुकसान पोहोचविले आहे. त्यामुळे आंबेडकरी जनता संतप्त झाली असून पोलिसाकडे तक्रार करून आठ दिवस लोटले तरी अद्यापही कारवाई झालेली नसल्यामुळे येत्या २० जुलै रोजी रिपाई च्या वतीने पोलीस ठाण्यावर आक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा रिपाई आठवले गटाचे प्रदेश सचिव डॉ.संतोष कटारे व शहराध्यक्ष सुरेश निकम यांनी दिला आहे २५ जूनला दोन गटातील हाणामारीत एका गटांनी थेट हाडोळा परिसरात




हातामध्ये कोयता, चोपर, काठ्या असे घातक शस्त्र घेऊन तेथील नागरिकांना धमकावले. त्यामुळे महिला वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची तक्रार पोलिसाकडे देखील करण्यात आली होती मात्र त्याची अद्याप दखल घेतलेली नाही . परिणामी आठ जुलैला मध्यरात्रीच्या सुमारास पुन्हा हाडोळा परिसरात दहशत निर्माण करीत बारा गाड्यांची तोडफोड केलेली आहे. याबाबत परिसरात नागरिकांनी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तेथील नागरिकांची बैठक घेत ,या घटनेतील संबंधित आरोपींना तातडीने अटक करण्याचे आश्वासन दिले होते. आणि या परिसरात सीसीटीव्ही बसवण्याबरोबरच दररोज दोन पोलिसांचा जागता पहारा राहणार असल्याचे सुद्धा सांगितले होते. परंतु अद्याप कुठलीही कारवाई झालेली नसल्यामुळे , येत्या २० जुलैपर्यंत जर पोलिसांनी या घटनेतील सहभागी लोकांना अटक केली नाही तर रिपाई राज्यसचिव डॉ. संतोष कटारे व शहराध्यक्ष सुरेश निकम यांच्या मार्गदर्शनाखाली आक्रोश मोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती शिवराज मोरे , कुंदन दोंदे , वत्सला रणशवरे , रोहित कांबळे, रेना शेख आदींनी दिला आहे.

# नेकनूर येथे लोकशाही मार्गाने उपोषण लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

## नेकनूर ग्रामपंचयतची नगरपंचायत होईल का ?

**नेकनूर/प्रतिनिधी**

नेकनूर ग्रुप ग्रामपंचायत सावंतवाडीवैतागवाडी ग्रामपंचायत चे रूपांतर नगरपंचायत करण्यासाठी १८/०६/२०२४ रोजी रोजी मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद बीड यांनी नेकनूर ग्रामपंचायत ची विशेष ग्रामसभा घेऊन ठराव वरील पाठवावा असे पत्र दिले होते पण ग्रामपंचायत उडवा उडवी चे उत्तर देत असताना १०/०७/२०२४ रोजी विशेष ग्रामसभा घेऊ असे आम्हाला सांगितले होते पण विशेष ग्रामसभा न घेता मासिक मीटिंग ची सभा घेण्यात आली त्याच दिवशी १०/०७/२०२४ रोजी लोकशाहीच्या मार्गानेआम्ही विशेष ग्रामसभा घेण्याचे निवेदन दिले १४/०७/२०२४ रोजी पर्यंत ग्रामसभा घेऊन नगरपंचायत चा ठराव ना दिल्यास १५/७/२०२४ रोजी नेकनूर ग्रामपंचायत समोर बेमुदास साखळी उपोषण करण्यात येईल याचे असे निवेदन जिल्हाधिकारी बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड तहसीलदार साहेब बीड नामदार धनंजय मुंडे साहेब पालकमंत्री बीड केज, विधानसभेचे आमदार




नमिता ताई अक्षय मुंदडा ,नेकनूर पोलीस स्टेशन नेकनूर ग्रामपंचायत ,व सर्वांना निवेदन दिले होते, पण ग्रामपंचायत ने विशेष ग्रामसभा न घेतल्याने नेकनूर ग्रामपंचायत समोर १५/०७/२०२४ रोजे सकाळी दहा वाजता बेमुदत साखळी उपोषणासाठी नेकनूर ग्रामपंचायत समोर सय्यद शोहेब आमदार भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस व सतीश मुळे भाजपा नेते माजी ग्रामपंचायत सदस्य युवा नेते मतीन खतीब युवा नेते त्रंबकरावजीकडे युवा नेते अजय सिंह भारत रावजी काळे युवा नेते शेख अमेर युवा नेते हाजी सरफराज उद्दिन शेख अक्रम , मुसा चाऊस, व इतर बेमुद्रा साकडे उपोषणाला महिला व नागरिक गावाचे सर्व लोक उपोषणाला विजिट देत होते व भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) यांनीही उपोषण कर्त्यांना भेट दिलीआमचे उपोषणाला पाठिंबा दिला व उपोषण सोडवायला गटविकास अधिकारी पंचायत समिती मार्फत श्री मोरे साहेब पंचायत समिती बीड, व नेकनूर चे ग्राम विकास अधिकारी नागरे साहेब, सरपंच सुंदर रावजी लांडगे उपसरपंच सचिन भैय्या शिंदे व विरोधी पक्ष राजा भय्या व ग्रामपंचायत सदस्य य साजिद अली, शेख इजहारुद्दीन ग्रामपंचायत सदस्य,शिवाजीराव शिंदे ग्रामपंचायत सदस, या सर्वांनी उपस्थनास्थळी येऊन १५/०८/२०२४ रोजी विशेष ग्रामसभा घेऊ असे लेखी दिल्यामुळे आम्ही बेमुदत साखळी उपोषण मागे घेतले शेवटी लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन छेडून यश मिळाले

# मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी शेतकरयांनी शेणखत, हिरवळीचे खत गांडुळ खताचा वापर करावा, कैलास पन्हाळकर

**बीड प्रतिनिधी** :- महाराष्ट्र राज्य बीड पाटोदा... वॉटरशेड ऑर्गनायझेशन पाटोदा विभाग शाश्वत उपजीविका प्रकल्पांतर्गत काकडहीरा गावच्या जैविक शेतीच्या विकासासाठी एक पाऊल पुढे घेण्यासाठी मा.विष्णुपंत जायभाय (मेजर ) मा.मोहन (नाना)जायभाय यांनी हाती घेतली असून आज वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट व ॲक्सिस बॅक फाउंडेशन च्या माध्यमातून काकडहिरा गावात लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब सेंद्रिय शेतकरी गट, जिजामाता स्यंयम साहायता शेतकरी गट, बळीराजा शेतकरी बचत गट या



तीन शेतकरी गटाच्या माध्यमातून 600 लिटर दशपर्णी तयार केला होता त्या दशपर्णी अर्काच्या विक्री चे उद्घाटन आज करण्यात आले यावेळी उपस्थित महिला व बालकल्याण प्रकल्प विकास अधिकारी महादेवजी जायभाये साहेब , वॉटर ऑर्गनायझेशन चे कैलास पन्हाळकर सर, कवठेकर भरत सर काकडहीरा सरपंच मा .संजयजी जायभाये, उपसरपंच साहेब,,,,,CRP राजू ताई जायभाय जिजामाता महिला स्वयंसहायता गटाने दशपर्णी तयार केला त्या गटाचे अध्यक्ष सिंधुबाई आघाव आणि सचिव शालन ताई आघाव उपस्थित होत्या यावेळी गावातील शेतकरी यावेळी माती परीक्षणाचे रिपोर्ट माहिती सांगून एका एका मुद्यावर चर्चा करून सविस्तर माहिती दिली आणि दशपर्णी अर्क माती परीक्षण रिपोर्ट वितरण केले . मातीच्या नमुन्या विषयी सविस्तर चर्चा होऊन सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी च्या उपाययोजना कुजलेले शेणखत, हिरवळीचे खत, गांडुळ खत वापरून आपण मातीचे आरोग्य सुधारू शकतो याची माहिती दिली.सेंद्रिय शेतीचे पुरस्कर्ते सन्माननीय श्री मोहन जायभाय श्री. विष्णुपंत जायभाय दशपर्णी अर्क वितरणाच्या माध्यमातून भेट देन्याचा योग आला... पाहून खुप आनंद वाटला....विशेष आवडली एक गोष्ट ती म्हणजे भरपूर प्रमाणात गावात परसबाग केलेल्या आहेत या मध्ये ही सेंद्रिय. गोष्टचा वापर केला आहे . पाहुन खुप आनंद वाटला.आपल्या मुलांच्या निरोगी आरोग्यासाठी विषमुक्त सेंद्रिय भाजीपाला खाने गरजेचे आहे ते कैलास पन्हाळकर सर यांनी परसबागेच्या माध्यमातून मार्गदर्शन केले... आज वॉटरशेड संस्थेच्या माध्यमातून काकडहीरा येथे महिलांनी तयार केलेले दशपर्णी आर्क महादेव जायभाय सरांनी परसबागेच्या भाजीपाल्यावर फवारणी साठी दिले.यावेळी पांडुरंग जायभाय सर पूर्ण मार्गदर्शन ऐकून घेतले आणि लगेचच या गटाकडून 4 बॉटल खरेदी केल्या खुप खुप अभिनंदन तुमचे व सर्व टिमचे शेवटी विष्णुपंत जायभाय मेजर वॉटरचे आभार व्यक्त केले आपला आम्हाला सार्थ अभिमान आहे असे त्यांनी त्यांच्या गाववाल्याचे वतीने म्हणाले ....!

# परभणी जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबेना; दिड वर्षात १३४ आत्महत्या

**परभणी प्रतिनिधी**

परभणी:- जिल्ह्यात मागील वर्षी जानेवारी ते डिसेंबर दरम्यान १०३ आणि यावर्षी जानेवारी ते जून दरम्यान ३१ असे मिळून दिड वर्षात एकूण १३४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने देण्यात आली. एकूण १०३ शेतकऱ्यांनी विविध कारणांमुळे आत्महत्या जिल्ह्यात विविध कारणांनी शेतकरी आत्महत्या होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सततचा दुष्काळ, अतिवृष्टी, नापिकी आणि बँकेचा कर्ज वसूलीसाठी सततचा तगादा आदी कारणांमुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबायचे नाव घेत नाही. त्यामुळे सुपिक व काळी जमीन जिल्ह्यात असूनही शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. वर्ष २०२३-२४ या आर्थिक वर्षात सर्व तालुक्यांत मिळून एकूण १०३ शेतकऱ्यांनी विविध कारणांमुळे आत्महत्या केल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यामधील ५९ आत्महत्या केलेले शेतकरी सरकारी मदत मिळण्यास पात्र झाले आहेत. तर ४४ शेतकरी आत्महत्या प्रकरणे अपात्र करण्यात आली आहे. तसेच चालू वर्षातील जानेवारी ते जून दरम्यान आत्महत्या केलेल्या ३१ शेतकऱ्यांपैकी केवळ ९ शेतकरी आत्महत्या प्रकरणे



मदतीस पात्र झाले आहेत. तर ५ शेतकरी आत्महत्या अपात्र करण्यात आली आहे. तर एकूण १७ शेतकरी आत्महत्या प्रकरणे प्रलंबीत आहेत. शेतकरी जगला पाहिजे यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत अन्नदाता शेतकरी जगला पाहिजे यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत. मात्र, तरीही जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत असल्याचे दिसून येत आहे. आत्महत्या केल्याच्या प्रमुख कारणांमध्ये सततची नापिकी, बँकेचा कर्ज वसुलीसाठी लावलेला तगादा, अतिवृष्टी, कोरडा दुष्काळ आदींचा समावेश आहे. राज्य शासनाच्या वतीने आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटूंबास सरकारी मदत दिली जाते. मात्र ती तात्पुरती मलमपट्टी असल्याचे वारंवार दिसून आले आहे.

## प्रा.दगडू भरकड, ज्योतिबा गोणारकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड

**नांदेड प्रतिनिधी**



: नांदेड : मराठा सेवा संघाचे किनवट तालुका अध्यक्ष समाजप्रेमी व्यक्तिमत्त्व प्रा.दगडू भरकड व गोकुंदा ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य प्रगतशील शेतकरी ज्योतिबा गोणारकर यांचा वाढदिवस दरवर्षी एक अभिनव सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून साजरा होत असतो.यावर्षी भरकड व गोणारकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने किनवट गोकुंदा येथील मराठा सेवा संघ प्रणित छत्रपती संभाजी राजे मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या प्रांगणात वृक्ष लागवडीचा व संगोपनाचा संकल्प करण्यात आला. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच गोणारकर व भरकड यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## डाक विभागाकडून आकर्षक राखी लिफाफे केवळ १० रुपयात

**बीड प्रतिनिधी**, दि. 15 : डाक विभागाकडून आकर्षक राखी लिफाफे केवळ दहा रुपयात मिळणार आहेत. रक्षाबंधन सणासाठी ज्या बहिणीला भावाकडे अथवा भावाला बहिणीकडे प्रत्यक्ष जाता येत नाही म्हणून डाक विभागाने 'विशेष राखी कवरची ' सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आकर्षक राखी कवर हे पोस्ट ऑफिसमध्ये प्रती नग केवळ 10/- रुपये या किमतीमध्ये उपलब्ध करून देत आहेत.

या कवरमध्ये राखी टाकून बहिणी आपल्या भावासाठी राखी पाठवू शकतात. जे भाऊ घराचा आर्थिक भार उचलण्यासाठी मोठ्या शहरात काम करतात, जे भाऊ सीमेवर राहून आपल्या देशाचे रक्षण करतात, जे भाऊ दुस-या राज्यात जाऊन मजूरी करतात, जे भाऊ मोठया शहरात व्यवसाय करतात अशा प्रकारे अनेक कारणांनी ज्या बहिणी भावाला भेटू शकत नाहीत त्यांच्यासाठी हा विशेष उपक्रम.

तसेच आजच्या व्हटसअॅप (Whats app)



आणि ईमेल (email) च्या काळात सर्वजन संदेश (massage) पाठवून किंवा व्हिडीओ कॉल (Video call) करुन रक्षाबंधन साजरा करतात पण जर प्रत्यक्षात राखी देवून रक्षाबंधन साजरा करण्यात आला तर तो आनंद व्दिगुणीत होईल, तसेच जुन्या परंपराना उजाळा मिळेल.

जिल्हयातील सर्व डाकघरे हे नागरिकांना सेवा देण्यासाठी सदैव अग्रेसर आहेत, तरी सर्व नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीड डाकघर विभागाचे अधिक्षक यांनी सर्व

## भीमराव धोंडे मित्र मंडळ यांच्या वतीने पाटोद्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे शिबीर संपन्न...

**पाटोदा/प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील माता बहिणीला मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळावा म्हणून आमदार भीमराव धोंडे मित्र मंडळ यांच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरून देण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याची घोषणा सरकारने केली यामध्ये जास्तीत जास्त पाटोदा तालुक्यातील महिलांना लाभ मिळवा म्हणून आमदार भीमराव धोंडे मित्र मंडळ यांच्या वतीने पाटोद्यात शिबिर घेण्यात आले यावेळी माजी सरपंच पांडुरंग सानप,अनिल जायभाय,संजय कांकरिया,पिकु गर्जे,अँड सय्यद, आविळे सर,शेख नदीम,विनोद राऊत होते या शिबिरात शेकडो महिलांचे अर्ज भरून देण्यात आले शिबीर पाटोदा पंचायत समिती कॉम्प्लेक्स मधील श्रेयस डिजिटल येथे रविवारी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या नेतृत्त्वाखाली घेण्यात आले कार्यक्रमाचे आयोजन गणेश शेवाळे यांनी केले तर आभार श्रेयश डिजिटलचे मालक बाळासाहेब बन यांनी मानले




## एम.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल सासवडचा पालखी सोहळा



**सासवड प्रतिनिधी** :आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर एम.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल सासवड प्रशालेतील विद्यार्थ्यांचा पालखी सोहळा आज संत सोपानकाका मंदिरामध्ये उत्साहात साजरा झाला. प्रमुख पाहुणे ह.भ.प. स्वप्निल महाराज काळाने व प्रशालेच्या मा. मुख्याध्यापिका कल्पना नागनूर यांच्या हस्ते पालखी व संतरूपी बालचमुंचे पूजन करण्यात आले. यावेळी छोट्या गटापासून ते आठवीच्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी तालासुरात अभंग,भजन गायन केले. तसेच काहींनी विठ्ठल प्रेमाचा भाव व्यक्त करणारे नृत्य व मनोरे सादर केले. त्यामुळे सर्व वातावरण भक्तीमय झाले होते.

मा.मुख्याध्यापिका कल्पना नागनूर मॅडम यांनी आपल्या प्रास्ताविकात पालखी सोहळ्याचे महत्त्व पटवून दिले. तर प्रमुख पाहुणे ह.भ.प.स्वप्निल महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या उदाहरणातून जीवनमूल्य सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली रुचिरा गार्डी व निकिता होले तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. भाऊसाहेब येळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## महिलांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा.जावेद खान

**औरंगाबाद प्रतीनीधी**

औरंगाबाद शहर आणि जिल्ह्यातील पात्र महिला युवती लाभार्थींनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा राज्य शासनाने खास महिलांसाठी ही महत्वकांक्षी योजना सुरू केली आहे दि. ३१ ऑगस्ट पर्यंत यासाठी अर्ज दाखल करायचा आहे. हा अर्ज ऑनलाईन आणि ऑफलाइन दोन्ही प्रकारे करता येणार असून हे अर्ज अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, किंवा शहरात ऑल



इंडिया मजलीस ए इत्तेहादुल मुस्लिमीनच्या दारुस्सलाम या कार्यालयात अथवा ए आय एम आय एम च्या विविध नगरसेवकांनी सुरू केलेल्या शिबीरामध्ये भरू शकता. राज्य शासनाने घालून दिलेल्या निकषात असणाऱ्या पात्र महिला लाभार्थींनी महिना १५०० रुपये थेट महिलांच्या खात्यात जमा होणार आहेत. तरी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवहान एक आय एम आय एम युवा जिल्हा कार्याध्यक्ष जावेद खान यांनी केले आहे स्त्री पुरुष समानता लाभ करणे आणि सर्व महिला आणि मुलींना सक्षम करणे साधन साधत विकास यापैकी एक ध्येय आहे महिलांना सामाजिक आर्थिक आणि राजकीय उपक्रमात संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध धोरणे, कार्यक्रमाने योजना राबविण्यात येत आहेत राज्य सरकारने ७ मार्च रोजी राज्याचे चौथे महिला धोरणही जाहीर केले त्यानुसार राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे.याचा लाभ घ्यावा असे आवाहन जावेद खान यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे ही नोंदणी संपूर्णतः मोफत असुन कुणीही यासाठी कुणाला देखील पैसे देऊ नये

## एवढा मुसळधार पाऊस की, चक्क महामार्गावरील पूल गेला वाहून

**परभणी प्रतिनिधी**

जिंतूर: औंढा महामार्ग रस्त्याचे काम सुरू आहे, मात्र काम संथ गतीने सुरू आहे. दरम्यान पाचेगाव जवळ पर्यायी पूल तयार करण्यात आला होता. परंतु दिनांक 15 जुलै रोजी दुपारी 4 च्या सुमारास जोरदार पावसाने हजेरी लावल्यामुळे पाचेगाव रेपा परिसरात असलेल्या महामार्ग



रस्त्यावर तात्पुरत्या स्वरूपात मातीचा बांधलेला पूल वाहून गेल्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूने वाहनाच्या रांगा लागल्या होत्या.

परिणामी वाहनधारक व प्रवासी नागरिक तसेच या परिसरातील नागरिकांना त्यामुळे नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मागील आठ दिवसात दुसऱ्यादा वाहतूक ठप्प झाल्याने या परिसरातील रस्ता व पुलाचे काम त्वरित करण्यात यावे, अशी परिसरातील नागरिकांकडून मागणी जोर धरत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे



# भुजबळ-पवार भेटीवर मनोज जरांगे यांची प्रतिक्रिया? ; म्हणाले,भुजबळ अचानक कसा?





**प्रतिनिधी**

राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी आज माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांची भेट घेतली. ओबीसी आणि मराठा समाजातील दरी वाढत असून राज्यात स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती छगन भुजबळ यांनी शरद पवार यांना केली आहे. तब्बल दीड तास ही बैठक झाली. बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी मीडियाशी संवाद साधून त्याची माहिती दिली. भुजबळ यांच्या या भेटीगाठीवर मनोज जरांगे पाटील यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. राज्यात स्फोटक परिस्थिती निर्माण होण्याला छगन भुजबळच जबाबदार असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मीडियाशी संवाद साधताना हा आरोप केला आहे. कोणी कुणाची भेट घेतली हे मी काय सांगू शकतो? स्फोटक परिस्थिती त्यांनीच केली आहे. ओबीसी नेत्यांना हाताशी धरून कोयत्याची भाषा केली. गोरगरीब संपले पाहिजे हा छगन भुजबळ यांचा उद्देश आहे. भुजबळांना ज्यांनी मोठं केलं, त्यांनाच ते बेईमान झाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना मंत्री केले. तुरुंगात जाण्यापासून वाचवले. तरी त्यांच्या मागे भिकार बोलत होते. जिथे जातात तिथेच ते XX खातात

## असा माणस जन्मूच नये

**शरद पवारांनी आरक्षण दिले. त्यांचाच कार्यक्रम भुजबळांनी वाजवला. छगन भुजबळ बेईमान आहेत. कुठल्याही जातीत असे लोक जन्मू नये. शरद पवार, अजित पवार आणि शिवसेना... सर्वांचाच त्यांनी गेम केला. पृथ्वीतलावर असा माणूस जन्मालाच नाही पाहिजे. जातीय तणाव करणारा, दंगली लावणारा, गोरगरीब ओबीसी आणि गोरगरीब मराठ्यात भांडण लावणारा माणूस होऊ नये, असं मनोज जरांगे म्हणाले**

**सामान्य ओबीसी आणि मराठा गावागावात भावासारखे राहतात. मात्र आधी छगन भुजबळ व्यवस्थित राहिला असता तर आज राहुल गांधी आणि मोदींकडे जायची वेळ आली नसती. आजवर मी धनगर, ओबीसी आणि मुस्लिम यापैकी एकाही माणसाला दुखावलं नाही. हा छगन भुजबळ मराठ्यांच्या नोंदी रद्द करा म्हणतोय. किती मूर्ख माणूस आहे हा, अशी टीका त्यांनी केली.**

## मालशिरस येथील लिंबाचीवाडी ,पाटीलवस्ती याठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**सासवड प्रतिनिधी:**
माळशिरस ग्रामपंचायतीच्या वतीने महिला व बालकल्याण निधीमधून प्राथमिक शाळा माळशिरस, लिंबाची वाडी, पाटील वस्ती येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले .याप्रसंगी माळशिरस ग्रामपंचायत च्या विद्यमान सरपंच आरती यादव, उपसरपंच अशोक( बाप्पू )यादव ,पुरंदर तालुका युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष माऊली यादव ,माजी सरपंच सदाशिव बापू डोंबाळे, ग्रामसेवक बडदे भाऊसाहेब, ग्रामपंचायत सदस्य शरद यादव, दीपक यादव, ग्रामपंचायत सदस्य सविता गद्रे, विठ्ठल आप्पा इंदलकर, भाऊसाहेब यादव ,दीपक बोरावके, विजय कामठे, बाबासाहेब बोरावके, नवनाथ यादव ,अमीर मुलानी, सचिन बोरकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने जिल्हा कचेरी समोर धरने आंदोलन संपन्न




**बीड/प्रतिनिधी**
सम्यक विद्यार्थी आंदोलन बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हा कचेरी समोर धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व सम्यकचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे यांनी केले. उच्च शिक्षित तरुणांच्या रोजगाराची व्यवस्था करा अन्यथा त्यांना बेरोजगारी भत्ता तरी द्या.माहागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्तीची रक्कम वाढवा. मागील शैक्षणिक वर्षातील प्रलंबित विद्यार्थ्यांची स्वाधार तात्काळ त्यांच्या खात्यात वर्ग करा. मुलींना मोफत शिक्षण या सरकारच्या घोषणेची तात्काळ अंमलबजावणी करा. इत्यादी विषयांवरती आज सम्यकने बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे धरणे आंदोलन केले. आज बीडमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस असल्याने आंदोलन व जिल्हाधिकारी कार्यालयात लेखनी बंद आंदोलन असल्याने सम्यकला आंदोलन आटोपते घ्यावे लागले. यावेळी ओबीसी नेते विष्णू दादा देवकते,सम्यकचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, प्रमोद निकाळजे,किरण वाघमारे,अजय सरवदे,लखन जोगदंड,सचिन मेघडंबर,रोहन जोगदंड,रोहन लांडगे,कुणाल वारभुवन, इत्यादी सह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# नदीपात्रात दुर्गंधीयुक्त घाण; महाराष्ट्र प्रदुषण विभागाने घेतले पाण्याचे नमुने

**परभणी प्रतिनिधी**

गंगाखेड: तालुक्यातील खळी पाटी जवळील गोदावरी नदी पुलाखाली नदीपात्रात साखर कारखान्यातील दुर्गंधी युक्त मळीचे घाण पाणी टाकल्या बाबत दै. शब्दभूमी न्यूजने वृत्त प्रकाशित करताच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभाग खडबडून जागे झाले. सोमवारी दुपारी खळी पाटी जवळील नदीपात्रात पाहणी करत पाणी नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. गंगाखेडच्या गोदावरी नदीपात्रात दुर्गंधीयुक्त मळीचे घाण पाणी गंगाखेड ते परभणी महामार्गावर अज्ञात व्यक्तीने टँकरच्या माध्यमातून साखर कारखान्यातील दुर्गंधीयुक्त मळीचे घाण पाणी आणून टाकल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली. दुर्गंधीयुक्त घाण पाणी थेट गोदावरी नदी पात्रातील पाण्यात मिसळल्याने पाण्याचा रंग काळसर झाला. तसेच पाण्यातील जलचर आणि नदी काठावरील ग्रामस्थांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता



असल्याचे वृत्त दै. शब्दभूमी न्यूजने प्रसिध्द केले. या वृत्ताची दखल घेत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभागातील सहाय्यक अधिकारी श्रीपाद कुलकर्णी, क्षेत्र अधिकारी नामदेव दारसेवाड, सय्यद महेबुब यांनी घटनास्थळी भेट दिली. पात्राची पाहणी करत मळी मिश्रित पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले. यावेळी खळी येथील ओमकार पवार, दुस्सलगाव येथील पोलीस पाटील सौ. संगीता कचरे, नसीर बेग आदींची उपस्थिती होती. घाण पाणी टाकणाऱ्याविरुध्द कारवाई करणार गोदावरी नदीपात्रात दुर्गंधी युक्त मळीचे घाण पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. छत्रपती संभाजी नगर येथील प्रयोग शाळेत तपासणीसाठी नमुने पाठविण्यात येणार आहेत. याचा अहवाल प्राप्त होताच नदीपात्रात दुर्गंधी युक्ती मळीचे घाण पाणी टाकणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्यात येणार आहे. नदीपात्रात किंवा रस्त्याच्या कडेला अशा प्रकारे मळीचे घाण पाणी टाकणाऱ्या टँकरची क्रमांकासही माहिती द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभागाचे क्षेत्र अधिकारी नामदेव दारसेवाड यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com